भारत निवडणूक आयोग

# काय करावे
आणि
# काय करू नये

## मतदान केंद्राध्यक्षासाठी

आवृत्ती १ जुलै २०२३

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | वितरण केंद्रावर | १ |
| २. | मतदान केंद्रावरील व्यवस्था | ३ |
| ३. | अभिरूप मतदानादरम्यान | ७ |
| ४. | मतदानास प्रारंभ करणे/मतदानादरम्यान | १० |
| ५. | मतदान समाप्त करणे | १२ |
| ६. | मतदान समाप्त झाल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करणे | १४ |
| ७. | मतदान समाप्त झाल्यानंतर साहित्य मोहोरबंद करणे | १५ |
| ८. | विशेष प्रकरणे | १७ |
| ९. | एकापेक्षा अधिक निवडणुका असल्यास | १९ |
| १०. | विविध ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची हाताळणी. | २१ |

# वितरण केंद्रावर

## ✓ १.१ काय करावे

१. मतदान केंद्राध्यक्षासाठी असलेल्या निदेश-पुस्तकाच्या नवीनतम आवृत्तीमध्ये दिलेले सर्व मतदान साहित्य तुम्ही घेतलेले आहे याची खात्री करा.

२. तुम्ही घेतलेले नियंत्रण युनिट, मतदान युनिट आणि व्हीव्हीपीएटी हे तुम्हाला दिलेल्या मतदान केंद्राशी संबंधित आहेत आणि तसेच प्रत्येक युनिटच्या मागील बाजूस असलेल्या धातुची पट्टी/बारकोडवरील क्रमांक, पत्त्याच्या खूण चिठ्ठीवर (अॅड्रेस टॅग) लिहिलेल्या युनिट आयडीशी जुळतो आहे याची खात्री करा.

३. बॅटरी पूर्ण विद्युत प्रभारीत (चार्ज) आहे हे तपासल्यानंतर नियंत्रण युनिट बंद करा.

४. प्रत्येक मतदान युनिटावर मतपत्रिका योग्य पद्धतीने बसवलेली आहे आणि मतपत्रिका पटल व्यवस्थित सरळ रेषेत आहे आणि थंबव्हील स्विचची मांडणी योग्य स्थितीत करण्यात आलेली आहे यांची तपासणी करा.

५. व्हीव्हीपीएटीच्या मागील बाजूस असलेला कागदी गुंडाळीचे लॉक प्रवासादरम्यान कागदी गुंडाळी लॉक ठेवण्यासाठी असावा तसे लॉक स्थितीत (आडव्या स्थितीत) असल्याचे तपासून पहा.

## × १.२ काय करू नये

१. निवासस्थान, हॉटेल इत्यादीसारख्या कोण-त्याही अनधिकृत ठिकाणी कोणतेही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी घेऊन जाऊ नये.

२. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सामान घेऊन जाण्यासाठी पुरविलेल्या वाहना-शिवाय इतर कोणत्याही वाहनाचा वापर करू नये.

३. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, व्हीव्हीपीएटी आणि इतर मतदान साहित्य घेतल्यानंतर ते, निर्देशित केलेल्या ठिकाणाखेरीज इतर कोणत्याही ठिकाणी ठेवू नका.

४. व्हीव्हीपीएटी चालू व बंद करू नका, त्यामुळे त्याची बॅटरी तसेच कागद कमी होतील आणि त्यामुळे मतदानादरम्यान समस्या निर्माण होईल.

५. वितरणा दरम्यान मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी यांची जोडणी करू नका.

६. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी यांची कोणतीही मोहोर काढू नका.

६. मतदान केंद्रावरील वापरासाठीचे सर्व प्रकारचे सांविधिक आणि असांविधिक नमुने व लिफाफे प्राप्त झालेले आहेत याची खात्री करा.

७. वितरण केंद्रावरून नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर जाण्यापूर्वी मतदान प्रक्रिया आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कार्यचालन यासंबंधातील कोणत्याही किंवा सर्व शंकांचे निरसन करून घ्या.

८. कोणतीही विसंगती आढळून आल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्याची माहिती करून द्या.

७. वितरणाच्या वेळी आणि मतदान केंद्रातील अभिरूप मतदानापूर्वी व्हीव्हीपीएटीची चाचणी करू नका.

# मतदान केंद्रावरील व्यवस्था

## ✓ २.१ काय करावे

१. मतदान पथकाचे सर्व सदस्य आणि सुरक्षा कर्मचारी आपल्या मतदान केंद्रावर उपस्थित राहतील.

२. मतदारांना मतदान केंद्राबाहेर प्रतिक्षा करण्यासाठी आणि पुरुष व महिला मतदारांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी आणि गर्भवती महिलांसाठी स्वतंत्र्य रांग लावण्या-साठी पुरेशी जागा असेल, याची खात्री करा.

३. आवश्यकता असल्यास पडदानशीन महिला मतदारांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांना पक्की शाई लावण्यासाठी आवश्यक असल्यास विशेष व्यवस्था असल्याची खात्री करा.

४. मतदारांना आत येण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र सोय (जागा) असल्याची खात्री करा.

५. मतदान युनिट (युनिटे) व व्हीव्हीपीएटी मतदान कक्षात अशा रीतीने ठेवा की, कुणामुळेही आंतरजोडणी केलेल्या केबलला अडथळा निर्माण होणार नाही, आणि केबल पूर्णपणे दिसेल आणि त्यामुळे मतदान केंद्राच्या आतील मतदारांच्या जाण्या-येण्याला अडथळा निर्माण होणार नाही.

६. नियंत्रण युनिट चालू करण्यापूर्वी, कागदी गुंडाळीसाठी असलेले व्हीव्हीपीएटीचा बंद-चालू स्विच (लॉक-अनलॉक स्विच) चालू-उभ्या स्थितीत असेल.

७. मतदानाची गुप्तता ठेवण्यासाठी मतदान अधिकारी आणि प्रतिनिधीची बसण्याची व्यवस्था अशारीतीने असावी की, सर्वांना मतदान युनिट, व्हीव्हीपीएटी आणि मतदान यंत्रावरील बटन दाबून आपले मत नोंदवणारा मतदार दिसणार नाही, याची सुनिश्चिती.

८. दिव्यांग व्यक्ती/जेष्ठ नागरिक, पुरूष व महिला मतदार यांच्यासाठी तीन स्वतंत्र रांगा लावण्यात येतील याची सिुनश्चिती करा.

९. मतदान प्रतिनिधींची नियुक्तीपत्रे तपासा आणि त्यांना लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२ च्या तरतुदी स्पष्ट करून सांगा. त्यांना ये-जा करण्यासाठी प्रवेशपत्र द्या.

१०. मतदान केंद्रात नियुक्त केलेल्या मतदान प्रतिनिधींची त्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नोंदणी झालेली आहे आणि त्यांच्याकडे मतदार छायाचित्र ओळखपत्र किंवा अन्य कोणतेही, शासनाने मान्यता दिलेले छायाचित्र असलेले ओळखपत्र असल्याची खात्री करा.

११. पुढील गोष्टींची सुनिश्चिती करा :

(क) मतदान केंद्राद्वारे बजावण्यात येणारी, मतदान क्षेत्र आणि मतदारांचा तपशील विनिर्दिष्ट करणारी नोटीस मतदान केंद्राच्या बाहेर लावण्यात आली आहे.

(ख) नमुना ७ ए मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीची प्रत मतदान केंद्राबाहेर ठळकपणे लावली आहे.

(ग) मतदार सुविधा भित्तीपत्रके आणि सूचना मतदान केंद्राच्या प्रवेशा-जवळील बाहेरील भिंतीवर लाव-लेली आहेत.

१२. मतदारांना आवश्यक सहाय्य पुरविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने मदत कक्ष/मतदार सहाय्य केंद्र (बुथ) उभारणे आवश्यक आहे.

१३. तुमच्या मतदान केंद्रावर नियुक्त केलेले सर्व सुरक्षा कर्मचारी उपस्थित आहेत याची सुनिश्चिती करा.

## ✕ २.२ काय करू नये

१. कोणत्याही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे, राजकीय पक्षांचे आणि स्थानिक लोक इ. चे आतिथ्य स्वीकारू नये.

२. मतदान केंद्राच्या आतमध्ये कोणत्याही कारणास्तव स्वयंपाक करण्यास किंवा विस्तव पेटविण्याची परवानगी देऊ नये.

३. मतदान केंद्राच्या आत धूम्रपान करण्यास परवानगी नाही.

४. मतदान केंद्रात कोणत्याही प्रकारचे शस्त्र आणण्यात येऊ नयेत.

५. मतदान केंद्रात भ्रमणध्वनीस परवानगी देऊ नका आणि मतदान कर्मचाऱ्यांनी देखील, मतदान केंद्रामध्ये त्यांचे भ्रमणध्वनी बंद/ ध्वनिविरहित स्थितीत ठेवावेत.

६. व्हीव्हीपीएटी वर किंवा त्याच्या समोर थेट प्रकाश येईल असे उच्च वॅट असणारे प्रखर बल्ब-ट्युब लावू नका आणि तसेच, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या व व्हीव्हीपी-एटीच्या मागील खिडकी उघडी असू नये.

७. मतदानाची गुप्तता राखण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) आणि व्हीव्हीपीएटी, वेब कॅमेरा /व्हिडिओ कॅमेरा यांसमोर प्रकट करू नका.

८. उमेदवाराशी किंवा पक्षाशी जोडलेला आहे अशा कोणत्याही व्यक्तीची, मतदान अधिकारी (मतदान अधिकारी त्याचे कर्तव्य पार पाडू शकत नसेल अशी अकल्पित परिस्थिती असल्यास) म्हणून नियुक्ती करू नका.

९. मतदान केंद्रामध्ये कोणत्याही नेत्याने कोणतेही छायाचित्र किंवा कोणत्याही राजकीय पक्षाचे कोणतेही प्रतिके किंवा निवडणुकींशी संबंधित घोषवाक्ये, लावलेली असू नयेत.

१०. मतदान केंद्रामध्ये आणि भोवताली आणि मतदान केंद्राच्या १०० मीटर क्षेत्रात कोणतेही प्रचार साहित्य लावले जाणार नाही.

११. कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रात अशा प्रकारे बसवू नये की, त्यांना एखादा मतदार त्याचे/तिचे मत नोंदवताना पाहण्याची संधी मिळेल.

१२. मतदान केंद्राच्या आत किंवा त्याच्या २०० मीटरच्या परिसरात प्राधिकृत व्यक्तींखेरीज इतर कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्यास बसण्याची परवानगी असणार नये.

१३. कोणत्याही छायाचित्रकारास/व्यक्तीस, मतदान कक्षात मतदार मतदान करतानाचे छायाचित्र घेण्याची परवानगी देऊ नका.

१४. मतदान कक्षामध्ये, मतदार आणि भारत निवडणूक आयोगाने ज्यांना परवानगी दिली आहे असे प्राधिकारी, यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश करू देऊ नये.

१५. कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रात किंवा केंद्राच्या १०० मीटरच्या आत उमेदवारांच्या किंवा राजकीय नेत्यांच्या नावांचे चिन्ह, निशाणी इ. लावण्यात आणि/किंवा प्रचार मोहिमेचा कोणताही भाग असू शकेल असे कोणत्याही प्रकारची त्यांची प्रतिके किंवा चित्रमय सादरीकरण करण्यास परवानगी असणार नाही.

१६. मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर नियुक्त केलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यास मतदारांची ओळख पडताळणी करू देऊ नका, कारण ते मतदान कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे.

१७. कोणत्याही सुरक्षा जवानास मतदान केंद्रामध्ये तैनात करण्यात येऊ नये.

१८. मतदान करण्यासाठी येणाऱ्या कोणत्याही विशेष महत्त्वाच्या व्यक्तीस किंवा प्रसिद्ध व्यक्तीस विशेष वागणूक देऊ नका.

# अभिरुप मतदाना दरम्यान

## ✓ ३.१ काय करावे

१. नियंत्रण युनियच्या दर्शक फलकावर दिसणाऱ्या विविध माहितीमध्ये दर्शवल्याप्रमाणे करा .

२. जर निदेश देण्यात आले असतील तर, अभिरुप मतदानाची कार्यवाही प्राधिकृत केलेल्या छायाचित्रणकाराद्वारे छायाचित्रित करावयाची आहे.

३. अभिरुप मतदानाकरिता मतदान युनिट आणि व्हीव्हीपीएटी मतदान कक्षात ठेवण्यात यावेत आणि त्याठिकाणी मतदान युनिटाचे कार्यचालन व व्हीव्हीपीएटीमध्ये मुद्रित झालेल्या कागदी चिठ्ठ्या यांचे निरीक्षण करण्यासाठी मतदान प्रतिनिधींसह मतदान अधिकारी उपस्थित असतील.

४. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी यांची आंतरजोडणी केल्यानंतर व्हीव्हीपीएटीचे कागदी गुंडाळी लॉक उभ्या स्थितीत ठेवा.

५. अभिरुप मतदानादरम्यान उमेदवारांच्या/ प्रतिनिधींच्या उपस्थितीत किमान ५० मते देण्यात यावीत.

६. मतदान अधिकाऱ्याद्वारे दिलेल्या मतांच्या नोंदी हाताने लिहून ठेवण्यात याव्यात.

७. नोटासह निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला यादृच्छिकपणे मत देऊन, मतदान प्रतिनिधीसह अभिरुप मतदान घेण्यात यावे.

८. नियंत्रण युनिटमधील अभिरुप मतदान निकालाची खात्री करून घ्या आणि हाताने लिहून ठेवलेल्या मतांच्या नोंदींशी पडताळून पहा.

९. **व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्समधून अभिरुप मतदानाच्या छापील कागदी चिठ्ठ्या बाहेर काढा** आणि मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपीएटीतील छापलेल्या कागदी चिठ्ठ्यांची मोजणी करा आणि प्रत्येक उमेदवाराचा निकाल जुळत असल्याची पुष्टी करा.

१०. अभिरुप मतदानामध्ये नोंदवलेल्या मतांचा हिशेब पुसून टाकण्यासाठी प्रत्यक्ष मतदानापूर्वी नियंत्रण युनिटवरील ‘क्लिअर’ हे बटण दाबा.

११. मतदान प्रतिनिधींद्वारे रिकाम्या ड्रॉप बॉक्सची पडताळणी केलीच पाहिजे.

१२. मोहोरबंद करण्याच्या आणि अभिरुप मतदान व्हीव्हीपीएटी कागदी चिठ्ठ्यांची साठवणूक करण्याच्या कार्यपद्धतीचे अनुसरण करा.

१३. प्रत्यक्ष मतदानास प्रारंभ करण्यापूर्वी व्हीव्हीपीएटीचा ड्रॉप बॉक्स दोरा आणि पत्ता खूणचिठ्ठीसह मतदान केंद्राध्यक्षाची मोहोर वापरुन मोहोरबंद करा आणि त्यावर मतदान प्रतिनिधींच्या सह्या घ्या.

१४. नियंत्रण युनिटचा निकाल विभाग हिरव्या कागदी मोहोरेने, विशेष खूणचिठ्ठीने आणि पत्ता खूणचिठ्ठीने मोहोरबंद करा आणि त्यावर मतदान प्रतिनिधींच्या सह्या घ्या.

१५. मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल-भाग एक (अभिरुप मतदान प्रमाणपत्र) तयार करा आणि त्यावर मतदान प्रतिनिधींच्या सह्या घ्या.

१६. प्रत्यक्ष मतदानास प्रारंभ करण्यापूर्वी नियंत्रण युनिटमधील अभिरुप मतदानाची मते पुसून टाकली आहेत आणि व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्समधून अभिरुप मतदानाच्या व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या काढून टाकल्या आहेत, यासाठीचा मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल भाग-एक मध्ये इतर मतदान अधिकाऱ्यांच्या सह्या घ्या.

१७. मतदान केंद्रात अभिरुप मतदान समाप्त करते वेळी नियंत्रण युनिटच्या दर्शकफलकावर दाखवलेला दिनांक व वेळ तपासा आणि त्याची नोंद घ्या, आणि तसेच, त्यावरील दिनांक व वेळ आणि प्रत्यक्ष दिनांक व वेळ या दोन्हींमध्ये कोणतीही विसंगती असल्यास, ती अभिरुप मतदान प्रमाणपत्रामध्ये आणि तसेच मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीमध्ये देखील नमूद करा.

१८. **अभिरुप मतदान पूर्ण झाल्यानंतर** अभिरुप मतदानाची स्थिती तुमच्या क्षेत्र अधिकाऱ्या मार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळवा.

१९. सूक्ष्म निरीक्षकाची नेमणूक केलेली असल्यास, अभिरुप मतदानाच्या सर्व कार्यवाहीत तो सहभागी झालाच पाहिजे आणि मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल भाग-१ वर (अभिरुप मतदान प्रमाणपत्र) त्यांची सही घ्यावयाची आहे.

## ✕ ३.२ काय करू नये

१. जर कोणताही मतदान प्रतिनिधी उपस्थित नसेल किंवा फक्त एक मतदान प्रतिनिधी उपस्थित असेल, तर अभिरुप मतदान सुरू करू नका. १५ मिनिटे वाट पहा.

२. किमान ५० मते दिल्याशिवाय अभिरुप मतदान बंद करू नका.

३. अभिरुप मतदानात नोटासह प्रत्येक उमेदवारास किमान एक मत देण्यास विसरू नका.

४. अभिरुप मतदानासाठी मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपीएटी एकाच टेबलावर ठेवू नका (मतदान युनिट व व्हीव्हीपीएटी मतदान कक्षात ठेवा.)

५. नियंत्रण युनिटचा मागील विभाग मेणाने सीलबंद करू नका.

६. मतदानाच्या दिवशी अभिरुप पूर्ण झाल्यानंतर व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांच्या कप्प्यात अभिरुप मतदानाच्या कोणत्याही चिठ्ठ्या राहू देऊ नका.

७. अभिरुप मतदानाच्या व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांवर शिक्का मारल्याशिवाय त्या काळ्या लिफाफ्यात ठेवू नका.

८. अभिरुप मतदानातील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा हिशेब व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांच्या हिशेबाशी जुळविण्यास विसरू नका.

९. अभिरुप मतदान प्रमाणपत्र (मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल-भाग एक) भरण्यास आणि मतदान प्रतिनिधींच्या सह्या घेण्यास विसरू नका.

१०. प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी नियंत्रण युनिटातील अभिरुप मतदानाची माहिती पुसून टाकण्यास विसरू नका.

११. नियंत्रण युनिटचा निकाल विभाग आणि व्हीव्हीपीएटीचा ड्रॉप बॉक्स मोहोरबंद केल्याशिवाय आणि त्यावर मतदान प्रतिनिधींच्या सह्या घेतल्याशिवाय प्रत्यक्ष मतदानास प्रारंभ करु नका.

# मतदानास प्रारंभ/मतदाना दरम्यान

## ✓ ४.१ काय करावे

१. नियोजित वेळी मतदानास प्रारंभ होईल, याची सुनिश्चिती करा.

२. उपस्थित असलेल्या सर्वांना मतदानाची गोपनीयता राखण्याबाबत लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२८ च्या तरतुदी स्पष्ट करून सांगा आणि गोपीनियतेचा कोणत्याही प्रकारे भंग केल्याबद्दल असलेली शास्ती त्यांना सूचित करा.

३. विहित केलेल्या प्रपत्रातील अनुदेशांनुसार घोषणापत्र वाचा.

४. पक्की शाई हाताळण्याशी संबंधित योग्य ती काळजी घ्या.

५. अभ्यागत प्रपत्र ठेवा आणि आयोगाने विहित केल्याप्रमाणे अभ्यागतांच्या नोंदी करा.

६. तुमच्या क्षेत्र अधिकाऱ्यामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदानाची प्रारंभाची स्थिती कळवा.

७. पहिल्या मतदाराने नमुना १७ए (मतदार नोंदवही) मध्ये सही करण्यापूर्वी मतदान अधिकारी-१, मतदान केंद्राध्यक्षासोबत तपासणी करील आणि “नियंत्रण युनिट तपासले आणि शून्य असल्याचे आढळले” अशी नमुना १७ए मध्ये शाईने नोंद करील.

८. मतदाराने मतदान युनिटास आणि व्हीव्हीपीएटीस कोणत्याही रितीने छेडछाड केलेली नाही, याची सुनिश्चिती करण्यासाठी नियमित कालांतराने मतदान युनिट व व्हीव्हीपीएटी यांची तपासणी करा.

९. मतदान मतदारांच्या अनुक्रमांप्रमाणे चालू आहे, याची सुनिश्चिती करण्यासाठी नियंत्रण युनिटवरील ‘टोटल’ हे बटन दाबून प्रत्येक नियंत्रण युनिटची ‘एकूण’ ठराविक वेळाने तपासा. (ही ‘एकूण मतदार’ नोंदवहीशी म्हणजेच, नमुना १७ए च्या शेवटच्या अनुक्रमांकाशी जुळली पाहिजे.)

१०. प्रत्येक दोन तासाला मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत मतदानाशी संबंधित बाबींचे संकलन करण्यासाठी आणि विनिर्दिष्ट केलेल्या माध्यमामार्फत ती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पाठवा. सांख्यिकीय माहिती जमा करा.

११. जर कोणत्याही मतदारास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर मतदान कसे करावे हे जाणून घ्यायचे असेल तर, त्यास नकली (डमी) मतपत्रिकेवर स्पष्ट करून सांगा.

## ✖ ४.२ काय करू नये

१. मतदान प्रतिनिधींच्या अनुपस्थितीमध्ये मतदान कक्षात प्रवेश करू नका.

२. अशिक्षित मतदारास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर कसा करावा आणि त्याने त्याचे मत कसे द्यावे, हे स्पष्ट करण्यासाठी मतदानाच्या वेळी मतदान कक्षामध्ये प्रवेश करू नका. त्यासाठी कार्डबोर्डवर असलेला बनावट (डमी) मतदान युनिटचा वापर करा.

३. मतदान केंद्राध्यक्षाने किंवा इतर कर्मचाऱ्यांनी वारंवार मतदान कक्षात जाऊ नये, त्यामुळे तक्रारी करण्यास वाव मिळेल.

४. मतदान समाप्त होईपर्यंत व्हीव्हीपीएटी वरील कागदी गुंडाळी नॉब कार्यान्वित (हलवू) करू नका.

५. प्रत्यक्ष मतदानादरम्यान केवळ व्हीव्हीपीएटी बदलला असल्यास, अभिरुप मतदान घेऊ नका. मतदानादरम्यान संपूर्ण संच बदलला असल्यास, नोटासह प्रत्येक उमेदवारास केवळ एक मत देऊन अभिरुप मतदान घेण्यात येईल.

६. मतदानादरम्यान संपूर्ण संच बदलला असल्यास नियंत्रण युनिटवरील अभिरुप मतदानाची माहिती पुसून टाकण्यास आणि अभिरुप मतदान प्रक्रियेमधील व्हीव्हीपीएटीतील व्हीव्हीपीएटी अभिरुप चिठ्ठ्या काढण्यास विसरू नका.

७. मतदान कक्षात व्हीव्हीपीएटीच्या वर कोणताही थेट प्रखर प्रकाश पडेल असा दिवा (बल्ब) लटकवू नका.

८. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी जोडणी करते वेळी आणि जोडणी काढते वेळी नियंत्रण युनिट चालू करू नका.

९. मतदान युनिटचे/व्हीव्हीपीएटीची आंतर जोडणी करणारी केबल टेबलाच्या पायास ‘पारदर्शक’ चिकटपट्टीने चिकटवण्यास विसरू नका.

१०. केबलची जोडणी काढून घेत असताना कनेक्टरच्या दोन्ही बाजूच्या कड्या दाबण्यास विसरू नका.

११. मतदान प्रक्रियेदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र चालू किंवा बंद करू नका.

१२. मतदान समाप्त झाल्यानंतर नियंत्रण युनिटचे बंद (क्लोज) बटण दाबण्यास विसरू नका.

# मतदान बंद करणे

## ✓ ५.१ काय करावे

१. मतदान जरी उशिरा सुरू झालेले असले तरीही ते नियत केलेल्या वेळी बंद करा. या वेळी रांगेत असलेल्या शेवटच्या व्यक्तींपासून सुरूवात करून, फक्त रांगेतील मतदारांना मतदान केंद्राध्यक्षांच्या स्वाक्षरीसह क्रमांक दिलेल्या चिठ्ठ्या द्या.

२. नियत केलेल्या वेळेनंतर कोणतीही आणखी व्यक्ती रांगेत येणार नाही याची सुनिश्चिती करा.

३. वरील कार्यपद्धतीनुसार शेवटच्या मतदाराने मतदान केल्यानंतर नियंत्रण युनिटवरील 'बंद' (क्लोज) बटन दाबले आहे याची आणि मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल भाग-तीन तयार करण्यात आला आहे याची सुनिश्चिती करा.

४. नियंत्रण युनिटमध्ये नोंदलेल्या मतांच्या एकूण संख्येची नमुना १७सी च्या भाग-एकच्या बाब ६ मध्ये नोंद घ्या.

५. मतदान बंद करते वेळी नियंत्रण युनिटच्या दर्शक फलकावरील मतदान समाप्त केल्याच्या दिनांकाची व वेळेची मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीमध्ये नोंद करा.

६. नियंत्रण युनिट बंद करा आणि मतदान युनिटाची व्हीव्हीपीएटीपासून जोडणी काढा आणि नियंत्रण युनिटची व्हीव्हीपीएटीपासून जोडणी काढा.

७. मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये व्हीव्हीपीएटीचचा ऊर्जा संच (पॉवर पॅक) काढून घ्या.

८. मतदान समाप्त झाल्यानंतर, नियंत्रण युनिटमध्ये नोंदलेल्या मतांचा हिशोब नियम ४९एस अन्वये तयार करा. (असा हिशेब नमुना १७-सी भाग-एक मध्ये दुसऱ्या प्रतीत तयार करण्यात येईल आणि त्याची एक प्रत प्रत्येक मतदान प्रतिनिधीला देण्यात येईल.)

## ✖ ५.२ काय करू नये

१. मतदान प्रतिनिधींना नोंदलेल्या मतांच्या हिशोबाच्या प्रती सादर करण्याशी संबंधित नियम ४९एस अन्वये भाग-तीन (जोडपत्र-६) मध्ये मतदान समाप्त करताना घोषणापत्र तयार करण्यास विसरू नका.

२. मतदान पूर्ण झाल्यानंतर व्हीव्हीपीएटी त्याच्या वाहतूक पेटीमध्ये मोहोरबंद करण्यापूर्वी, व्हीव्हीपीएटीमधून व्हीव्हीपीएटी ऊर्जा संच (पॉवर बॅक) (बॅटरी) काढण्याचे विसरू नका.

३. अभिरूप मतदानादरम्यान किंवा, यथास्थिति, प्रत्यक्ष मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बदलले असल्यास भाग-चार व भाग पाच मधील मतदान समाप्त करतेवेळी मतदान केंद्राध्यक्ष अहवाल तयार करण्याचे विसरू नका.

४. मतदान समाप्त करतेवेळी नियंत्रण युनिटचे 'बंद' (क्लोज) बटन दाबण्यास विसरू नका.

५. मतदान समाप्त केल्याचे क्षेत्र अधिकाऱ्यांना/ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळविण्याचे विसरू नका.

# मतदान समाप्त झाल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करणे

## ✓ ६.१ काय करावे

१. मतदान युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी यांची जोडणी काढण्यापूर्वी नियंत्रण युनिटमधील विजेचे बटण (पॉवर) बंद (स्वीच ऑफ) करा.

२. व्हीव्हीपीएटीची ऊर्जा संच (पॉवर पॅक) काढण्यात आलेला आहे आणि व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉपबॉक्समधील कागदी चिठ्ठ्या सुरक्षित आहेत आणि मतदान युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट व व्हीव्हीपीएटी त्यांच्या-त्यांच्या वाहतूक पेट्यांमध्ये ठेवले आहेत याची सुनिश्चिती करा.

३. मोहोरबंद करण्याच्या प्रयोजनासाठी वाहतूक पेट्यांच्या दोन्ही बाजूस असलेल्या दोन्ही छिद्रांतून दोरा ओवून त्याची दोन्ही टोके मोहोरबंद करून आणि निवडणूक, मतदान केंद्र आणि त्यामध्ये असलेले युनिट आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या सही, दिनांक व शिक्का (मोहोर) यांचे तपशील दर्शवणाऱ्या खूणचिठ्ठीने (ॲड्रेसटॅग) दोरा मोहोरबंद करून प्रत्येक वाहतूक पेटी मोहोरबंद केलेली आहेत याची सुनिश्चिती करा.

४. उमेदवार किंवा त्यांचे मतदान प्रतिनिधी उपस्थित असल्याची आणि त्यांना त्यांची मोहोर लावण्याची इच्छा असल्यास तशी त्यांना त्यांची मोहोर लावण्याची मुभा देखील देण्यात येईल याची सुनिश्चिती करा.

५. मतदान युनिटच्या (युनिटांच्या) आणि नियंत्रण युनिटच्या वाहतूक पेट्यांवर ज्या उमेदवारांनी/मतदान प्रतिनिधींनी त्यांची मोहोर लावली आहे. त्यांच्या नावांची नोंद मतदान केंद्राध्यक्षाने मतदान समाप्त करते वेळीच्या घोषणापत्रात केली आहे याची सुनिश्चिती करा.

## ✕ ६.१ काय करू नये

१. मतदान केंद्राध्यक्षासाठीच्या दैनंदिनीमध्ये दिलेल्या प्रपत्राखेरीज इतर कोणतेही प्रपत्र वापरू नका.

२. मोहोरबंद करतेवेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्हीव्हीपीएटी यांवर योग्य पत्ता चिठ्ठी (ॲड्रेस टॅग) लावण्यास विसरू नका.

३. मोहोरबंद करतेवेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्हीव्हीपीएटी आणि त्यांच्या वाहतूक पेट्या यांवर मेण ठेवू नका.

# मतदान समाप्त झाल्यानंतर साहित्य मोहोरबंद करणे

## ✓ ७.१ काय करावे

१. मतदान केंद्राध्यक्षाच्या निदेशपुस्तिकेमध्ये दिलेल्या अनुदेशांनुसार सर्व निवडणूक कागदपत्रे मोहोरबंद करा.

२. मतदान केंद्राध्यक्षाच्या निदेशपुस्तिकेतील अनुदेशांनुसार सांविधिक, असांविधिक पाकीटांची आणि निवडणूक साहित्याची बांधाबांध करणे.

३. मतदानाशी संबंधित सर्व निवडणूक कागदपत्रे नियम ४९ यू च्या तरतुदीनुसार मोहोरबंद केले आहेत याची सुनिश्चिती करावी.

४. निवडणूक कागदपत्रे असलेले प्रत्येक पाकिट मतदान केंद्राध्यक्षाच्या मोहोरेने मोहोरबंद केले आहे याची सुनिश्चिती करा.

५. मतदान केंद्रात उपस्थित उमेदवारांची किंवा त्यांच्या प्रतिनिधींची इच्छा असल्यास, अशा पाकिटांवर त्यांची मोहोर लावण्यास त्यांना मुभा दिली आहे, याची सुनिश्चिती करा.

६. नमुना १७सी (नोंदवलेल्या मतांचा हिशोब) ची एक प्रत सर्व मतदान प्रतिनिधींना देण्यात आली आहे, याची सुनिश्चिती करा.

७. मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी पूर्ण केल्याची सुनिश्चिती करा. त्यातील सर्व बाबी भरलेल्या असाव्यात. मतदान केंद्रामध्ये कोणतीही घटना घडल्यास त्याची नोंद दैनंदिनीमध्ये घेण्यात यावी. निरीक्षकास सादर करावयाचा मतदान केंद्राध्यक्षाचा अतिरिक्त अहवाल विहित नमुन्यात भरा.

८. मतदान पूर्ण झाल्यानंतर, परत संकलन केंद्रावर येताना, तुम्ही तुम्हास निर्देशित केलेले वाहनच घेणे आणि निर्देशित केलेल्या मार्गानेच येणे आवश्यक आहे.

९. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निर्देशित केल्याप्रमाणे, काऊंटरनिहाय संकलन केंद्रामध्ये, विनाविलंब सर्व साहित्य (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्हीव्हीपीएटी आणि ६ मतदान कागदपत्रे) जमा करा.

## ✕ ७.२ काय करू नये

१. संकलन केंद्रावर परत आल्यानंतर तेथे काऊंटरवर सर्व साहित्य जमा करण्यास उशीर करू नका.

२. जेथे साहित्य संकलित करण्यात येत आहे तेथे सर्व बाबी जमा केल्याशिवाय आणि त्यानंतर प्राधिकृत अधिकाऱ्याकडून कार्यमुक्ती प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय संकलन केंद्र सोडू नका.

३. कोणत्याही परिस्थितीत, तुम्हास निर्देशित केलेला मार्ग आणि वाहन बदलू नये.

# विशेष प्रकरणे

## ✓ ८.१ काय करावे

१. मतदान केंद्रावर मत देण्यासाठी येणारा कोणताही मतदार एकतर अंध किंवा शारिरिकदृष्ट्या अक्षम किंवा मतदान युनिटवरील चिन्हे पाहू शकत नसेल तर त्या मतदारास, सोबत्याच्या मदतीने मतदान करण्यास मुभा देण्यात येईल. अंध/दृष्टिहीन मतदारास, जर त्याची/तिची इच्छा असल्यास त्यास/तिला ब्रेल मतपत्रिका पुरविण्यात येईल.

२. सोबती म्हणून कृती करण्यास मुभा देण्यापूर्वी, त्याने/तिने विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र दिलेच पाहिजे आणि त्याच्या उजव्या हाताच्या मधल्या बोटावर पक्की शाई लावण्यात येईल. जर त्याच्या उजव्या हातावर आधीच पक्क्या शाईने खूण केलेली असेल तर, त्यास सोबती म्हणून कृती करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३. मतदारांची ओळख पटवणाऱ्या मतदान अधिकाऱ्यास मतदान करण्यास आलेल्या मतदाराचे नाव अनुपस्थित, स्थलांतरित मयत यादीमध्ये (ASD) असल्याचे आढळून आल्यास, तो त्याला मतदान केंद्राध्यक्षाकडे जाण्याची विनंती करील, मतदान केंद्राध्यक्ष त्याची ओळख पटविण्याचे काम पूर्ण करतील.

४. एखादा मतदार निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचे आणि/पक्षाचे आणि/चिन्हाचे नाव असलेली अनधिकृत ओळख चिठ्ठी सोबत आणत असल्यास, संबंधित मतदान प्रतिनिधीला असे उल्लंघन थांबविण्याच्या सूचना द्या.

५. अशिक्षित मतदार असल्यास, पहिल्या मतदान अधिकाऱ्यांने मतदाराचा अनुक्रमांक वाचावा आणि त्याच्या सत्यतेची खात्री करण्यासाठी मतदारास त्याचे/तिचे नाव सांगण्यास सांगावे.

६. मतदार, त्याची ओळख पटवून देऊ शकत नसेल आणि तो दुसऱ्या मतदाराच्या जागी तोतयागिरी करत असल्याचे आढळून आल्यास, त्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्यक्षाच्या निदेशपुस्तिकेतील विहित नमुन्यात पोलीस ठाणे अंमलदाराकडे, तक्रारपत्रासह पोलिसांकडे सोपवण्यात यावे.

७. मतदारांची ओळख पटवताना आणि मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये मतदारांच्या अनुक्रमांकावर खूण करताना, त्या मतदाराचे मत आधीच दिलेले आहे असे निदर्शनास आले आणि जर तो मतदार खरा असल्याचे आढळून आल्यास, त्यास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी, त्याचे/तिचे मत प्रदत्त मतपत्रिकेद्वारे देण्यास परवानगी देण्यात यावी.

## ✕ ८.२ काय करू नये

१. जर एखाद्या मतदाराने मतदान न करण्याचे ठरवले असेल तर, त्या मतदारास मतदान करण्यासाठी जबरदस्ती करू नका.

२. कोणत्याही मतदान कर्मचाऱ्यास, त्याच्याकडे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र किंवा, यथास्थिति, टपाली मतपत्रिका असल्याशिवाय, मतदान केंद्रात त्याचे मत देण्याची परवानगी देऊ नका.

३. कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही मतदान केंद्रावर, एकाच दिवशी, एकापेक्षा अधिक मतदारांचा सोबती म्हणून कृती करण्यास परवानगी असणार नाही.

४. प्राधिकृत सोबत्याच्या उजव्या हाताच्या मधल्या बोटास पक्क्या शाईने आधीच खूण केलेली असेल तर, अशा व्यक्तीला संबंधित मतदाराचा प्राधिकृत सोबती म्हणून कृती करण्यास परवानगी असणार नाही.

५. एखादा प्राधिकृत सोबती केवळ मतदान कक्षापर्यंत आला असेल (परंतु त्याने मतदान कक्षात प्रवेश केलेला नसेल) तर त्याचा समावेश नमुना १४ ए मध्ये होणार नाही.

६. कोणत्याही मतदान कर्मचाऱ्याने अंध मतदाराचे त्याच्यावतीने मत देण्यासाठी सोबती म्हणून कृती करू नये.

७. मतदाराने मतदान केल्यानंतर कोणत्याही प्राधिकृत सोबत्यास मतदान कक्षामध्ये थांबण्याची मुभा देण्यात येऊ नये.

८. "आक्षेपित मतांसाठी" संबंधित मतदान प्रतिनिधीने रोखीने २ रु. जमा केल्याशिवाय, मतदाराच्या ओळखीबाबतचा आक्षेप विचारात घेऊ नका.

९. एखाद्या मतदाराने, त्याचे तपशील मतदार नोंदवहीमध्ये नोंदवल्यानंतर मतदान न करण्याचे ठरविले असेल तर, त्यास मतदान करण्यासाठी दबाव टाकू नका किंवा भाग पाडू नका. मतदार नोंदवहीतील त्या मतदाराच्या संबंधित नोंदीपुढील "शेरा" या स्तंभात तशा अर्थाची नोंद करा.

१०. जर तुम्हाला एखादा मतदार मतदानाच्या वयापेक्षा म्हणजे १८ वर्षांपेक्षा कमी आहे असे वाटत असेल, मात्र त्याच्या ओळखीबाबत अन्यथा तुमची खात्री पटलेली असेल, तर त्याच्याकडून त्याच्या वयाबाबतचे प्रतिज्ञापत्र घ्या. त्याच्या पात्रतेबाबत त्यास प्रश्न करू नका.

११. मतदान न करण्याचे ठरविणाऱ्या एखाद्या मतदारामुळे मतदार नोंदवहीच्या स्तंभ १ मधील कोणताही अनुक्रमांक बदलू नका.

१२. एखाद्या मतदाराच्या नावाने अगोदरच कोणी व्यक्ती मतदान करून गेल्यानंतर, मतदान केंद्रात मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारास मतदान यंत्रावर मतदान करण्यास परवानगी देऊ नका, त्याऐवजी प्रदत्त मतपत्रिकेचा वापर करा.

१३. तुम्ही सूचना दिल्यानंतर देखील एखादा मतदार मतदानाची गुप्तता राखण्यासाठी विहित केलेल्या मतदान कार्यपद्धतीचे अनुसरण करण्यास नकार देत असेल तर, त्यास मतदान करण्यास परवानगी देऊ नका.

# एकाच वेळी निवडणुका असल्यास

## ✓ ९.१ काय करावे

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी यांच्या ओळखीबाबतची पुढील सुनिश्चिती करा.

(क) संसदीय मतदारसंघासाठी (लोकसभा)इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी यांवर पांढरे चिकटणारे लेबल (स्टीकर)

(ख) विधानसभा मतदारसंघासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपीएटी यांवर चिकटणारे गुलाबी लेबल (स्टीकर)

२. लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी निर्देशित केलेले मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी यांच्या संचांची त्यांच्या पत्ता खूणचिठ्ठीप्रमाणे (ॲड्रेस टॅगप्रमाणे) अचूकपणे आंतर-जोडणी केलेली आहे, याची सुनिश्चिती करा.

३. एकाचवेळी निवडणुका असल्यास, लोकसभा निवडणुकीसाठीच्या नियंत्रण युनिटमध्ये बसवलेल्या हिरव्या कागदी मोहोरेवर, फक्त उपस्थित असतील त्या लोकसभा निवडणुकीत उमेदवारांची किंवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी आहे आणि तसेच विधानसभा निवडणुकीसाठीच्या नियंत्रण युनिटमध्ये लावलेल्या हिरव्या कागदी मोहोरेवर केवळ विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारांची किंवा त्यांच्या मतदान प्रतिनिधीची स्वाक्षरी आहे याची सुनिश्चिती करा.

४. मतदान युनिटे व व्हीव्हीपीएटी यांची नियंत्रण युनिटांशी असलेली जोडणी काढून टाका आणि त्यांच्या संबंधित वहन पेट्यामध्ये त्यांना मोहोरबंद करा.

५. दोन्ही निवडणुकांचे आवश्यक ते सर्व साहित्य मोहोरबंद करण्यासाठी ठरवून देण्यात आलेल्या रंगांचे संकेत असलेले लिफाफे आणा.

## ✕ ९.२ काय करू नये

१. मतदारांनी दोन्ही मतदान यंत्रांवर मतदान केल्याशिवाय, त्यांना बाहेर पाठवू नका.

२. दोन्ही निवडणुकांची कागदपत्रे एकत्र बांधू नका.

३. सर्व युनिटांच्या वहन पेट्या एकमेकात मिसळू नका आणि त्यांना, निवडणूक ओळखचिठ्ठी पक्की चिकटवलेल्या आणि त्यावर त्यांची पत्ता खूणचिठ्ठी (ॲड्रेसटॅग) लावलेल्या त्यांच्या-त्यांच्या संबंधित वहन पेट्यांमध्ये ठेवा.

# विविध ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी हाताळणे.

## १०.१ काय करू नये

**मतदानकेंद्राकडे जाण्यासाठी निघताना**

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी ज्या मतदान केंद्रास नेमून दिलेले आहे त्याच विशिष्ट मतदान केंद्राशी संबंधित आहेत, याची सुनिश्चिती करण्यास विसरू नका.

२. निवास, बाजार इत्यादींसारख्या कोणत्याही अनधिकृत ठिकाणी कोणतेही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी युनिट घेऊन जाऊ नका.

३. व्हीव्हीपीएटी यंत्र पुन्हा-पुन्हा चालू-बंद करू नका. त्याची बॅटरी, तसेच कागदी गुंडाळी कमी होईल आणि त्यामुळे मतदान प्रक्रियेदरम्यान समस्या निर्माण होईल.

४. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांची जोडणी करत असताना किंवा जोडणी काढून टाकत असताना, नियंत्रण युनिट बंद करण्यास विसरू नका.

५. नियंत्रण युनिटपासून मतदान युनिटची आणि व्हीव्हीपीएटीची जोडणी काढत असताना केबल ओढू नका.

६. वितरणाच्या वेळी व्हीव्हीपीएटी चालू करू नका.

७. वितरणादरम्यान, मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपीएटी यांची जोडणी करू नका.

८. व्हीव्हीपीएटीची वाहतूक करत असताना त्याचा नॉब उभ्या म्हणजेच चालू स्थितीत ठेवू नका.

९. निर्देशित केलेल्या ठिकाणाशिवाय अन्य कोणत्याही ठिकाणी थांबू नका.

१०. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी मधील कोणतीही मोहोर काढून टाकू नका.

११. वितरणच्यावेळी व परत येतेवेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या वाहनाखेरीज अन्य वाहनाचा वापर करू नका.

## अभिरूप मतदानादरम्यान

१. जर एकही निवडणूक प्रतिनिधी उपस्थित नसेल किंवा एकच निवडणूक प्रतिनिधी उपस्थित असेल, तर अभिरुप मतदान सुरू करू नका. १५ मिनिटे वाट पहा.

२. किमान ५० मते दिल्याशिवाय अभिरूप मतदान बंद करू नका.

३. अभिरूप मतदानासाठी मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी एकाच टेबलावर ठेवू नका. मतदान युनिट व व्हीव्हीपीएटी मतदान कक्षात ठेवा.

४. अभिरुप मतदानादरम्यान नोटासह प्रत्येक उमेदवाराला किमान एक मत देण्यास विसरू नका.

५. मतदानाच्या दिवशी, अभिरूप मतदान पूर्ण झाल्यानंतर व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांच्या कप्प्यात एकही अभिरूप मतदानाची चिठ्ठी राहू देऊ नका.

६. प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाची माहिती वगळण्यास (काढून टाकण्याचे) विसरू नका.

७. काळ्या लिफाफ्यामध्ये शिक्का न मारलेल्या अभिरूप मतदान व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या ठेवू नका.

८. अभिरूप मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील आकडा आणि व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या यांची संख्या यांचा मेळ घालण्यास, करण्यास विसरु नका.

९. मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाच्या भाग-एक मध्ये अभिरुप मतदान प्रमाणपत्र भरण्यास विसरू नका.

१०. नियंत्रण युनिटचा निकाल विभाग आणि व्हीव्हीपीएटीचा ड्रॉप बॉक्स मोहोरबंद केल्याशिवाय आणि मतदान प्रतिनिधींच्या सह्या घेतल्याशिवाय प्रत्यक्ष मतदानास सुरूवात करू नका.

## ✕ १०.२ काय करू नये

### अभिरुप मतदानादरम्यान

१. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी यांची जोडणी करतेवेळी आणि जोडणी काढते वेळी नियंत्रण युनिट सुरू करू नका.

२. अभिरूप मतदान प्रक्रियेतील नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाची माहिती पुसून टाकण्यास आणि व्हीव्हीपीएटीमधील व्हीव्हीपीएटी अभिरूप मतदान चिठ्ठ्या काढून टाकण्यास विसरू नका.

३. मतदान कक्षातील व्हीव्हीपीएटी वर प्रखर प्रकाश असलेला कोणताही दिवा (बल्ब) लावू नका.

४. मतदान युनिट किंवा व्हीव्हीपीएटीची आंतर-जोडणी करणारी केबल टेबलाच्या पायास "पारदर्शक" चिकटपट्टीने चिकटवण्यास विसरू नका.

५. मतदान प्रक्रियेदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र चालू किंवा बंद करू नका.

६. व्हीव्हीपीएटीचा कागद गुंडाळी खटका (नॉब) बंद (लॉक) म्हणजे आडव्या स्थितीत असल्यास, नियंत्रण युनिट चालू करू नका.

७. मतदान समाप्त होईपर्यंत कागद गुंडाळी खटका (नॉब) चालू/बंद करू नका.

८. केबलची जोडणी काढताना कनेक्टरच्या दोन्ही बाजूच्या कड्या दाबण्यास विसरू नका.

९. अशिक्षित मतदारांनी मत कसे द्यावे, हे त्यांना दाखवण्यासाठी मतदान कक्षात जाऊ नका. या प्रयोजनासाठी पुठ्ठ्याच्या (डमी) मतदान युनिटचा वापर करा.

१०. प्रत्यक्ष मतदानादरम्यान फक्त व्हीव्हीपीएटी बदलेले असल्यास, अभिरूप मतदान घेऊ नका.

११. मतदान समाप्त झाल्यानंतर नियंत्रण युनिटचे 'क्लोज' (बंद) बटण दाबण्यास विसरू नका.

१२. मतदान समाप्त झाल्यानंतर, व्हीव्हीपीएटी त्याच्या वाहक पेट्यांमध्ये मोहोरबंद करण्यापूर्वी, व्हीव्हीपीएटीमधून व्हीव्हीपीएटी ऊर्जा संच (पॉवर पॅक) काढण्यास विसरू नका.

१३. मतदानाच्या शेवटी जेव्हा नमुना १७सी तयार करण्यात येतो, तेव्हा नियंत्रण युनिट वरील 'टोटल' बटण दाबून, त्यावरील मतांची १७ए सोबत पडताळणी करण्यास विसरू नका.

भारत निवडणूक आयोग